राज्य स्तरावर अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय निर्माण करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-३६१७/प्र.क्र.११७/पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : १० मे, २०१८.

वाचा :-

१) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक युओएम-३१७७/२०४८-III-पी, दि.०५.११.१९७७.
२) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पीएमएन-०१/२००१/प्र.क्र.४३/पोल-१अ, दि. ११.०५.२००१.
३) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक आयपीएस-१२०५/प्र.क्र.६०१/पोल-१, दि.०३.०१.२००६.
४) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक रापोसे-१३०८/प्र.क्र.२२८/पोल-१अ, दि.२२.१०.२००९.
५) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक आयपीएस-२७०९/प्र.क्र.४५७/पोल-१, दि.०९.१२.२००९.
६) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/प्र.क्र.१०७ (अ)/पु.बां.२/पोल-३, दि.०४.०३.२०१४.
७) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१,दि.०२.०६.२०१५
८) गृह विभाग शासन निर्णयप क्रमांक अेपीओ-३६१६/प्र.क्र.१५८/पोल-३, दि.०५.०१.२०१७.
९) विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/१/ADG (EOW) पदनिर्मिती/२६५/२०१७, दि.०९.०२.२०१८.

प्रस्तावना :-

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक ०९ येथे नमूद दिनांक ०९.०२.२०१८ च्या पत्रान्वये राज्यस्तरावर अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे), महाराष्ट्र राज्य, मुंबई हे पद व इतर आवश्यक सहाय्यकारी पदे नव्याने निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, सद्यस्थितीत राज्यामध्ये आयुक्तालय व इतर विभागात आर्थिक गुन्हयांसंबंधात पर्यवेक्षकीय व क्षेत्रीय स्तरावर अधिकारी कार्यरत आहेत. राज्यातील सर्व

जिल्हयांमध्ये स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागातून व काही ठिकाणी आर्थिक गुन्हे शाखा/ पथक तयार करुन सहायक पोलीस आयुक्त / पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी आर्थिक गुन्हयांचे संबंधात कामकाज पहात असून त्यांच्यावर देखरेख, मार्गदर्शन, समन्वय, नियंत्रण व उपाययोजना इत्यादींसाठी राज्य पातळीवर आर्थिक गुन्हयांशी संबंधीत वरिष्ठ दर्जाचे पर्यवेक्षकीय पद सद्य:स्थितीत अस्तित्वात नाही. राज्यातील वाढती लोकसंख्या, शहरीकरणात होणारी वाढ, औद्योगीकरण, तंत्रज्ञान व संगणीकरणाच्या अनुषंगाने ई-पेमेंटव्दारे होणारे व्यवहार, बांधकाम व्यवसाय तसेच अन्य विविध क्षेत्रातील व व्यापार उद्योग धंद्यातील व्यवहारातुन होणारे आर्थिक घोटाळे, आर्थिक फसवणुक इत्यांदीमध्ये फार मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्यासाठी भविष्यात शासन, न्यायप्रणाली व इतर क्षेत्रातील व्यवसायीक तज्ञ, तपास अंमलदार/अधिकारी यांचेशी संपर्क ठेवणे व समन्वय साधून त्यावर उपाययोजना करणे व नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे राज्यामधील पोलीस ठाण्यांमधून दाखल आर्थिक गुन्हयांच्या न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणांचा निपटारा जलद गतीने करण्यासाठी व राज्यातील आर्थिक गुन्हयांवर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांना आळा घालण्यासाठी, पर्यायाने जिल्हयांमधील पोलीस अधीक्षकांवर नियंत्रण ठेवून, उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय व स्थानिक न्यायालयातील प्रकरणांचा/गुन्हयांचा आढावा घेवून त्यांना मार्गदर्शन करुन देखरेख करणे इत्यादी पर्यवेक्षीय कामासाठी तसेच राज्यातील आर्थिक गुन्हेगारीचा विचार करता तसेच भविष्यातील जागतिकीकरणाचे धोरण व वाढ लक्षात घेता त्यामध्ये होणाऱ्या आर्थिक गुन्हेगारीला व भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी व उपरोक्त संदर्भाधिन क्र.०८ येथे नमूद दिनांक ०५.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये आर्थिक गुन्हे विषयक कामकाजाकरीता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वर्ग केलेल्या पोलीस उपअधीक्षकांवर नियंत्रण, मार्गदर्शन व आर्थिक गुन्ह्यांच्या तपासात सुसुत्रता आणण्यासाठी अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे) हे पद व इतर सहाय्यकारी पदे निर्माण करणे आवश्यक ठरत आहे. यास्तव अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे) यांचे कार्यालय निर्माण करण्यास व सदर कार्यालयासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त विविध घटक कार्यालयासाठी मंजूर करण्यात आलेली समकक्ष दर्जाची पदे स्थानांतरीत/वर्ग करण्यास मान्यता देणेबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) यांनी विनंती केली आहे. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

राज्यातील आर्थिक गुन्हयांवर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांना आळा घालण्यासाठी अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय निर्माण करण्यास व सदर कार्यालयासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त विविध घटक कार्यालयासाठी मंजूर करण्यात आलेली खालील तक्त्यात नमूद समकक्ष दर्जाची पदे स्थानांतरीत/वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	स्थानांतरीत/वर्ग करण्यात येणारे समकक्ष दर्जाचे पद	स्थानांतरीत/वर्ग करण्यात येणाऱ्या समकक्ष पदाचे घटक कार्यालय, शासन निर्णय व क्रमांक	पदसंख्या
१.	अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे)	व्यवस्थापकीय संचालक/ अपर पोलीस महासंचालक	महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ मर्या., मुंबई १) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक युओएम-३१७७/२०४८-III-पी, दि.०५.११.१९७७. २) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक आयपीएस-२७०९/प्र.क्र.४५७/पोल-१, दि.०९.१२.२००९.	०१
२.	पोलीस अधीक्षक	सहायक पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)	पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई १) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पीएमएन-०१/२००१/प्र.क्र.४३/पोल-१अ, दि. ११.०५.२००१. २) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक रापोसे-१३०८/प्र.क्र.२२८/पोल-१अ, दि.२२.१०.२००९.	०१
३.	पोलीस उपअधीक्षक (वाचक)	पोलीस उपअधीक्षक	पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, यवतमाळ गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.०४.०३.२०१४.	०१

४.	पोलीस निरीक्षक (वाचक)	राखीव पोलीस निरीक्षक (पोलीस निरीक्षक (वाचक) असे नामांतरण करुन)	पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, यवतमाळ गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अपीओ-३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.०४.०३.२०१४.	०२
५.	सहायक पोलीस निरीक्षक	सहायक पोलीस निरीक्षक	पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, यवतमाळ गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अपीओ-३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.०४.०३.२०१४.	०८
६.	लघुलेखक	लघुलेखक	पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, यवतमाळ गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अपीओ-३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.०४.०३.२०१४.	०१
७.	प्रमुख लेखक	प्रमुख लेखक	पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, यवतमाळ गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अपीओ-३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.०४.०३.२०१४.	०१
८.	वरिष्ठ श्रेणी लिपीक	वरिष्ठ श्रेणी लिपीक	पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, यवतमाळ गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अपीओ-३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.०४.०३.२०१४.	०१
९.	कनिष्ठ श्रेणी लिपीक	कनिष्ठ श्रेणी लिपीक	पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, यवतमाळ गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अपीओ-३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.०४.०३.२०१४.	०२
	एकुण पदसंख्या			**१८**

२. उपरोक्त नवनिर्मित अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाचे कार्यक्षेत्र मुंबई पोलीस आयुक्तालय वगळता संपुर्ण राज्य असेल.

३. अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे), महाराष्ट्र राज्य, मुंबई हे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रत्यक्ष अधिपत्याखाली कार्यरत राहतील.

४. उपरोक्त नवनिर्मित कार्यालयासाठी आवश्यक जागा, वाहने व इतर सर्व साधनसामुग्री पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या आस्थापनेवरील मंजूर संसाधनांमधून उपलब्ध करुन द्यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१०१७५२१६९०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2018.05.10 17:54:23 +05'30'

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
२. मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधान परिषद/ विधानसभा.
३. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री,गृह(ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
५. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई
८. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक,प्रशिक्षणे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
११. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ.
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
१४. निवड नस्ती, पोल-३.